
पशु-आरोग्य

# पावसाळ्यात जनावरांची अशी घ्या काळजी

डॉ. मंजूषा पाटील
सहायक प्राध्यापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान
महाविद्यालय, परभणी
डॉ. पंकज हासे
सहायक प्राध्यापक
पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबई





जनावरांना पावसाळ्यात रोग होण्याचे कारण म्हणजे वाहत्या पाण्याबरोबर रोगास कारणीभूत असणाऱ्या जिवाणू आणि विषाणू यांचा प्रसार होणे हे होय. आजारी जनावराच्या मलमूत्रातून रोगजंतू शरीरातून बाहेर पडत असतात. वाहत्या पाण्याबरोबर हे जंतू निरोगी जनावरांचा चारा आणि पाणी दूषित करतात. पावसाळ्यात सूर्यप्रकाश कमी असल्याकारणाने सूर्यप्रकाशाने होणाऱ्या निर्जंतुकीकरणाला सुद्धा मर्यादा येते. हवेतील वाढलेली आर्द्रता रोगजंतूच्या पर्यावरणातील वाढीस कारणीभूत ठरते.

पावसाळा हा शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा ऋतू आहे. शेतकऱ्यांची पावसाळ्यापूर्वीच जमिनीची मशागतीची कामे सुरू होतात आणि पावसाळा सुरू झाला की पेरणीची कामे सुरू होतात. याच काळात जनावरे आजारी पडणे हे पशुपालकांना काही नवीन नाही. पावसाळा या ऋतूतच रोग होण्याचे प्रमाण अधिक असते. कारण अचानकपणे हिरवा चारा मुबलक प्रामणात उपलब्ध होणे, हिरव्या चाऱ्याबरोबर अपायकारक तण तयार होणे, वाहत्या पाण्याबरोबर रोग पसरविणारे जिवाणू आणि विषाणू यांचा प्रसार होणे, जमिनीत पाणी साठून दलदल निर्माण होणे, हवेतील आर्द्रता आणि गारवा वाढणे, सूर्यप्रकाश कमी होणे, पावसाळ्यात रोगजंतू पसरविणारे कीटक तयार होणे, सर्पासारखे सरपटणारे प्राणी जनावरांच्या गोठ्यात आश्रय घेणे, पावसाळ्यात जनावरांवर कामाचा ताण पडणे.

जनावरांना पावसाळ्यात रोग होण्याचे कारण म्हणजे वाहत्या पाण्याबरोबर रोगास कारणीभूत असणाऱ्या जिवाणू आणि विषाणू यांचा प्रसार होणे हे होय. आजारी जनावराच्या मलमूत्रातून रोगजंतू शरीरातून बाहेर पडत असतात. वाहत्या पाण्याबरोबर हे जंतू निरोगी जनावरांचा चारा आणि पाणी दूषित करतात. पावसाळ्यात सूर्यप्रकाश कमी असल्याकारणाने सूर्यप्रकाशाने होणाऱ्या निर्जंतुकीकरणाला सुद्धा मर्यादा येते. हवेतील वाढलेली आर्द्रता रोगजंतूच्या पर्यावरणातील वाढीस कारणीभूत ठरते. शेतकऱ्यांनी या सर्व बाबी लक्षात घेऊन पावसाळ्यापूर्वीच लाळ्या खुरकूत, घटसर्प, फऱ्या आणि बुळकांड्या या रोगांवर लस टोचून घ्यावी. आणखी काही आजार जनावरांना होतात.



१) **तीवा** : हा विषाणूजन्य आजार आहे. हा आजार गायवर्गीय जनावरांमध्ये आढळून येतो. यात प्रामुख्याने जनावरांना तीन दिवस सतत ताप असतो, नाकातून पाणी येते व खोकलाही असतो. जनावरे थरथर कापतात. मान, पाठ व मागील पायांचे स्नायू आकुंचित झाल्यामुळे आखडून चालते. गोठ्यातील चावणाऱ्या माशांचे वेळीच नियंत्रण करावे.

२) **घटसर्प** : हा जिवाणूजन्य आजार आहे. या आजाराचे जिवाणू थंड वातावरणाचा ताण आलेल्या जनावराच्या शरीरात प्रादुर्भाव करतात. सर्व वयोगटांतील जनावरांना हा आजार होतो. अचानक भयंकर ताप येणे, गळ्यावर सूज येणे, नाकातून पाणी येणे, श्वास घेतान घरघर आवाज येणे, श्वासोच्छवासाचा वेग वाढणे ही लक्षणे दिसतात. वेळीच उपचार केले नसल्यास जनावर दगावते.

३) **न्युमोनिया** : जनावरे पावसात भिजल्यामुळे हा आजार होतो. विविध प्रकारचे जिवाणू, विषाणू, बुरशींमुळे हा आजार पसरतो. विशेषत: पावसात भिजलेली शेळी, मेंढी व त्यांची करडे ही जास्त प्रमाणात या आजारास बळी पडतात. जनावरांना थंडी वाजून ताप येणे, नाकातून, डोळ्यातून पाणी येणे, खोकला येणे, श्वास घेताना घरघर आवाज येणे, श्वासोच्छवासाचा वेग वाढणे ही लक्षणे दिसतात.

तसेच शेळ्यांमध्ये आंत्रविषार, फाशी, निलजिवा आणि पीपीआर असे आजार पावसाळातील दूषित पाणी, चारा याद्वारे प्रसारित होतो.

तसेच व्यवस्थापनाच्या दोषांमुळे पोटफुगी व कासदाहही संभवू शकतो. पावसाळ्यात भरपूर हिरवे गवत उपलब्ध असल्याने ते अधाशीपणे खाण्याने जनावरांना अपचन, अतिसार, पोटफुगी यासारखे आजार होतात. पोटफुगी या आजारांत जनावरांची डावी कूस फुगलेली असते. त्यामुळे जनावर सुस्त होते. रवंथ करीत नाही. अशा वेळेस सर्वप्रथम जनावरास गोडेतेल पाजावे जेणेकरून वायू तयार होण्याचे प्रमाण कमी होते. तसेच गायीस १५ ते २० किलो हिरव्या चाऱ्यासोबत सरासरी ५ ते ८ किलो कोरडा चारा द्यावा.

* या काळात ओलाव्यामुळे अस्वच्छतेमुळे वातावरणात जंतूंचे प्रमाण वाढते. त्यामुळे दूध देणाऱ्या जनावरांमध्ये कासदाह हा आजार होऊ शकतो. त्यामुळे दूध काढण्यापूर्वी व नंतर पोटॅशिअम परमँगनेटच्या द्रावणाने कास स्वच्छ धुवावी. * पावसाळ्यात परजीवींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जंतांचे औषध जनावरांना पशुवैद्यकीय सल्ल्यानुसार देऊन घेणे आवश्यक आहे. * पावसाळ्यात माशा, मच्छर व चावणारे कीटक यांच्यामुळे होणारे थायलेरियासीस, बबेसिओसि असे रोग पसरू नयेत याची काळजी घ्यावी. * पावसाळ्यात जमीन कोरडी नसेल तर सतत ओलाव्यामुळे जनावरांच्या खुरांमध्ये जखमा होऊन अळ्या होण्याची शक्यता असते. अशा वेळी जखमा टर्पेंटाईनने साफ करणे, जमीन कोरडी ठेवणे व गोठ्यात फिनाईलची फवारणी करणे, गोठ्यातील जमीन टणक आणि उताराची करून घेतल्यास मलमूत्राचा निचरा होण्यास मदत होते. * चाऱ्याची साठवणूक कोरड्या जागेवर करावी. जेणेकरून खाद्यात बुरशी होणार नाही तसेच त्याचप्रमाणे पावसाळ्यामध्ये रासायनिक खतांची व कीटकनाशकांची विषबाधा जनावरांमध्ये प्रामुख्याने दिसून येते. (उदा. युरियाची विषबाधा) शेतीच्या कामाचे बी- बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके इत्यादी जनावरांच्या खाद्यापासून व गोठ्यापासून दूर ठेवावी. जनावरांना साठवलेले पाणी देताना त्यात तुरटी फिरवावी. त्यामुळे पाण्यातील गाळ तळाशी राहतो.

अशा प्रकारे पावसाळ्यात जनावरांची काळजी घेऊन आपण आरोग्यसंपन्न पशुपालन करू शकतो. ■